स.के.नं. ५१८/२०१८
नि. क्र. ४३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**
**माझे नाव –** बाळकृष्ण भिकू कदम
**वय वर्षे** –६२, **व्यवसाय** –शेती
**राहणार** – वालोपे, भोजवाडी, ता.चिपळूण, रत्नागिरी.

**मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एस.आर.वनकर यांचेमार्फत सुरु.**

मी सन २००८ पासून २०२४ पर्यंत वालोपे भोजवाडी, ता.चिपळूण येथील पोलीस पाटील होतो. दि.०७.०३.२०१८ रोजी पोलीसांनी मला चिपळूण नगरपालीका येथे बोलावले होते. तेथे सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे चित्रीकरण जप्त करण्यासाठी बोलावले होते. त्यावेळी तेथे पोलीस देखील हजर होते. तेथे संगणक हाताळण्यासाठी एक महिला होती तीचे नाव मला सांगता येणार नाही. नगरपालिकेचे झालेल्या मिटींगचे चित्रीकरण दाखविले. तेथे काय व्यवस्था होती ते मला आठवत नाही. त्या चित्रीकरणाचा भाग पेन ड्राईव्हमध्ये घेतला व पेन ड्राइव्ह जप्ती पंचनामा केला. त्या चित्रीकरणामध्ये मिटींग दिसते. परंतु, इतर काय आहे ते मला माहीत नाही. मिटींगचे सी.सी.टी.व्ही. चित्रीकरण दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता माझ्या समक्ष पाच कागदी लखोटे दाखवले. त्यापैकी चार कागदी लखोट्यांना लाखी सिल बंद असल्याचे दिसून येते. आरोपी व माझ्या समक्ष सदर सिल बंद पाकीटापैकी एका पाकीटात पेन ड्राईव्ह असलेल्या पाकीटाचे आज सिलबंद काढले. त्यामध्ये एका प्लास्टीकच्या डबीमध्ये काळ्या व लाल रंगाचा एक पेन ड्राईव्ह आहे.

(आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.केळकर यांनी सदर सी.सी.टी.व्ही. फूटेजचे चित्रीकरण पोलीसांनी दोषारोपत्रासह आरोपींना पुरवले नाही असे कथन केले. त्यामुळे सदर सी.सी.टी.व्ही. फूटेजचे चित्रीकरण मिळाल्याखेरीज पुढील सरतपास व उलटतपास घेणे अशक्य आहे. सदर सी.सी.टी.व्ही. फूटेजचे चित्रीकरण आरोपींना देण्याविषयी तपासी

अंमलदारास आदेश करावा म्हणून अर्ज दाखल केला. सबब, सदर साक्षीदाराचा उर्वरीत सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपासी अंमलदार म्हणणे दाखल करून तो अर्ज निकाली होईपर्यंत तहकूब.)

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/-
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१,चिपळूण.

दिनांक - १९/०१/२०२६
चिपळूण.

## - प्रमाणपत्र -

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | १९.०१.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १९.०१.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | २०.०१.२०२६ |